# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक ३०.०७.२०२२

## अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २९/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५७,१५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

## दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२९/०७/२०२२ रोजी दारूबंदी कायदयाअंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन वसमत ग्रा., सेनगाव व पोस्टे हिंगोली शहर येथे प्रत्येकी ०१ असे एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांकडुन ४९.९ लिटर दारू असा एकुण ९२,९००/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

## जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. २९/०७/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे कळमनुरी येथे ०३ तसेच पोस्टे वसमत शहर येथे ०२ व पोस्टे गोरेगाव येथे ०१ अशा एकुण ०६ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू. असा एकुण १७,५७०/—रू माल जप्त करण्यात आला असुनआरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपासकरण्यात येत आहे.